जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र सहाय्यीत योजनांकरीता सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) राबविण्यासाठी बँक खाती उघडण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीजीएम-१०.१७/(११२/२०१७)/अर्थ-१.

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :

१) वित्त विभागाचे अर्धशासकीय पत्र क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ४०/कोषा प्रशा-४, दि. १.६.२०१७.

२) वित्त विभागाचे क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.११/कोषा प्रशा-४, दि. ९.६.२०१७ रोजीचे पत्र.

३) जलसंपदा विभागाचे समक्रमांकाचे दि. १.७.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार जलसंपदा विभागाच्या केंद्र सहाय्यीत योजनांचा निधी वितरणासाठी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) या पद्धतीचा अवलंब करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर प्रणालीच्या अंमलबजावणीकरीता नोडल अधिकारी, राज्य योजना व्यवस्थापक व First Level Agency संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये घोषित करण्यात आलेले आहेत. PFMS प्रणालीद्वारे केंद्र सहाय्यीत योजनांसाठीचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी ५ सिंचन महामंडळ स्तरावर स्वतंत्र बँक खाती उघडण्यास मान्यता देण्याबाबतची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती. त्यास अनुसरून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :

जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील २ (दोन) केंद्र सहाय्यीत योजनांकरीता निधी वितरणासाठी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

१) Pradhan Mantri Krishi Sinchayee Yojana (PMKSY) (AIBP)

२) Pradhan Mantri Krishi Sinchayee Yojana (PMKSY)
Har Khet Ko Pani (HKKP) (CADWM)

२. जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र सहाय्यीत योजनांसाठीचा निधी PFMS प्रणालीद्वारे वितरीत करण्यात यावा.

३. प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजने (PMKSY) अंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचे अंतिम टप्प्यापर्यंत संनियंत्रण राहण्याच्या व जमा खर्चाचा ताळमेळ घालण्याच्या अनुषंगाने उपरोक्त दोनही योजनांकरीता संबंधीत ५ महामंडळांचे कार्यकारी संचालक यांच्या नांवे राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेत स्वतंत्र चालू खाते (Current Account) उघडण्यास परवानगी देण्यात येत आहे. **सदर बँक खाते पुढील अटींच्या अधीन राहून कार्यान्वित राहील :-**

१) योजना बंद झाल्यानंतर त्या योजनेचे खाते बंद करण्यात यावे, सदरची जबाबदारी संबंधीत पाटबंधारे विकास महामंडळांच्या कार्यकारी संचालक यांची राहील.

२) आवश्यकतेनुसार महामंडळाच्या बँक खात्यांतर्गत, नियंत्रक अधिकारी (C.O.) आणि आहरण व संवितरण अधिकारी (D.D.O.) यांच्या स्तरावरील Sub Ledger accounts उघडण्याची कार्यवाही संबधित महामंडळाने करावी.

३) सदर खात्यातील व्यवहार फक्त पीएफएमएस (PFMS) व्दारेच होणार असल्याने, ज्यावेळी निधी खर्च करावयाचा असेल, त्यावेळी संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी बँकेच्या नांवे निधी वितरणाचे आदेश (Fund Transfer Order (FTO)) निर्गमित करावेत. त्यासाठी पीएफएमएस प्रणालीवर लॉगिन करून (Login) FTO तयार करण्यात यावी.

४) उपरोक्त अट क्र. ३ प्रमाणे व्यवहार होत असल्यामूळे कोणत्याही परिस्थितीत चेकबुकचा वापर होणार नाही. त्यामुळे सदर खाते विना चेकबुकचे असल्याबाबत लेखी आदेश सर्व संबंधितांना महामंडळ स्तरावरून निर्गमित करण्यात यावेत.

५) सदर खात्यातून रोख अथवा चेकबुक अथवा आहरण पावती (Withdrawal Slip) याव्दारे व्यवहार करण्यावर बंदी घालण्यात येत आहे.

६) सद्य:स्थितीत एकूण २ केंद्र सहाय्यीत योजना पीएफएमएस प्रणालीद्वारे राबविण्यात येतील. तथापि, पुढील टप्प्यात जर यापेक्षा अधिक योजना पीएफएमएस प्रणाली अंतर्गत राबवावयाचा निर्णय झाल्यास प्रत्येक योजनेकरीता योजनानिहाय स्वतंत्र चालू खाते (Current Account) राष्ट्रीयीकृत / शेड्युल्ड बँकेत उघडण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

७) प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत प्रकल्प कामांच्या देयकांच्या अदायगीबाबत जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. पीएलएन-२०१८/प्र.क्र.०१/निवसं-१, दि. ११.१.२०१८ नुसार देयके पारित झाल्यानंतर रक्कम वर्ग करण्याची प्रक्रिया जास्तीत जास्त ७ दिवसांत पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. सं.क्र. २७१/१७/कोषा प्रशा-५, दि. ७.१०.२०१७ व दि. १२.१.२०१८ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२१५१२४०२४३७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Uddhav Rabhaji Dahiphale

Digitally signed by Uddhav Rabhaji Dahiphale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=05b3ca49b9a0a924fd4d8743e6e254e742308f02108527986e098afc27201f30, cn=Uddhav Rabhaji Dahiphale
Date: 2018.02.15 12:48:07 +05'30'

(उ. र. दहिफळे)
आंतर वित्तीय सल्लागार व उपसचिव

प्रति,

१) प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ,
५) संचालक (लेखा व कोषागारे) मुंबई,
६) संचालक (सुधारणा) संचालनालय, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई,
७) महालेखाकार कार्यालय, मुंबई / नागपूर,
८) सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) वित्त विभाग (व्यय-१२ / अर्थ-१०/ अर्थोपाय / कोषा प्रशा-५), मंत्रालय, मुंबई,
१०) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व पाटबंधारे विकास महामंडळे,
११) श्री. सुनिल मोने, तज्ञ वरीष्ठ वित्तीय सल्लागार, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) श्री. पद्मसिंह पाटील, सहायक राज्य नोडल अधिकारी, पीएफएमएस, मुंबई,
१३) अर्थ-१, कार्यासन संग्रहार्थ.